भारतीय जनता पार्टी

डॉ किरीट सोमैया
Chartered Accountant Ph.D.

नोव्हेंबर २६, २००८

# उर्जा प्रकल्प - महाराष्ट्र सरकारचा फार्स

## मार्च २००५ मध्ये ८ उर्जा प्रकल्पांची घोषणा करण्यात आली होती- आतापर्यंत एकाही कंपनीने प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही

-डॉ. किरीट सोमैय्या

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख आपले बनावट आणि नाटकी घोषणा करत राहण्याचे धोरण प्रामाणिकपणे राबवित आहेत. राज्याचे सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच, उर्जा मंत्रालयाने ११,००० मेगावॅट वीज निर्माण करणाऱ्या ८ नवीन उर्जा प्रकल्पांची घोषणा केली होती. परंतु आजपर्यंत या कंपन्यांपैकी एकीनेही आपला प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही ही धक्कादायक असली तरी वस्तुस्थिती आहे. ते सप्टेंबर २००५ पूर्वी सादर करण्यात येणार होते

मुंबईच्या पू उपनगरांसहित संपूर्ण महाराष्ट्रातील भारनियमनाची परिस्थिती दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. मुलुंड-भांडुप हा भाग आज नोव्हेंबर महिन्यातही रोजच्या चार तासाच्या भारनियमनाचा भार सोसत आहे. आता केवळ **"आर्थिक संकटामुळे येणारी मंदी म्हणजेच उत्पादकांनी कारखाने बंद करणे"**, हेच २००९ मध्ये येऊ घातलेल्या महाराष्ट्राच्या नागरी भागातील ८ तासांच्या भारनियमनापासून सामान्य जनतेला वाचवू शकते.

महाराष्ट्र सरकारने मार्च २००९ मध्ये खालील प्रमाणे सामंजस्य करार केले होते.

| प्रकल्प | क्षमता | सामजस्य कराराची तारीख |
|---|---|---|
| सिपको | २००० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| एसार | १५०० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| एमआर एनर्जी | १००० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| इस्पात | १००० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| रिलायन्स | ४००० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| स्पेक्ट्रान टेक | ५०० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| टाटा पॉवर | १००० मेगावॅट | ४ एप्रिल २००५ |
| एकूण | ११००० मेगावॅट | |

अटी : १. प्रकल्प अहवाल सप्टेंबर २००५ पर्यत
२. वित्तीय बंद— मार्च २००६
३. आरंभ मार्च २००९/१०

महावितरण-महाराष्ट्र सरकार यानी डॉ. किरीट सोमैय्यांना अशी माहिती दिली आहे कि आतापर्यंत एकाही कंपनीने प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही. वित्तीय बेद नंतर ५ वर्षानी वीज निर्मिती सुरू करता येते. वित्तीय बंद २००९ मध्ये झाले तर निर्मितीसुद्धा २०१५ नंतरच सुरू होईल. सत्य हेच आहे कि बहुतेक उर्जा प्रकल्प मार्च २००५ मध्ये ज्या टप्प्यावर होते त्याच टप्प्यावर आजही आहेत.

*प्रसिद्धी सचिव*

9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081 – Tel: 21634152/21639649